# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय

**जाहिरात**

क्र.नअ/13213/आसेप्र दि.25.11.2024

महानगरपालिका आयुक्त, यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/4555 दि.10.10.2024 नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नगर अभियंता खात्याच्या आस्थापनेवरील विविध अभियंता संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. सदर पदासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in/for prospects/Careers-All/Recruitment/City Engineer या संकेतस्थळावर प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून, त्यासाठी उमेदवारांनी वरील नमूद संकेतस्थळावर **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदांकरिता ऑनलाईन अर्ज** या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर करावेत.

''**कनिष्ठ अभियंता** व **दुय्यम अभियंता**'' या पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते/त्या अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता / अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत.

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र आणि इतर माहिती वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

1) <u>रिक्त पदांचा तपशिल</u> -

**अ) पदाचे नाव** - **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

**वेतनश्रेणी (सुधारित)** - **स्तर- M23 - रु. 41,800-1,32,300 + अनुज्ञेय भत्ते**

**एकूण रिक्त पदे** - **250**

**गट** - **'क'**

| **जात प्रवर्ग** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **सावशैमा** | **आदुघ** | **खुला** | **एकूण पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 9 | 11 | 4 | 1 | 1 | 2 | 2 | 10 | 7 | 8 | 28 | 83 |
| महिला (30%) | 7 | 11 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 11 | 8 | 7 | 25 | 76 |
| माजी सैनिक (15%) | 4 | 6 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 5 | 4 | 3 | 13 | 39 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 2 | 5 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | 11 |
| खेळाडू ( 5%) | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | 11 |
| अंशकालीन (पदवीधर उमेदवार) 10% | 2 | 4 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 4 | 3 | 2 | 8 | 25 |
| **एकूण पदे** | **24** | **37*** | **8** | **2** | **5** | **4** | **4** | **35** | **25** | **22** | **84** | **250** |

| | |
|---|---|
| क) अनाथ मुले (1%) | परिपत्रक क्र. एमबीसी/ 9476 दि. 26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ-2022/ प्रक्र. 122/का.03 दि. 06.04.2023 मधील निदेशानुसार उपलब्ध एकूण 250 पदावर 3 पदे आरक्षित होत आहेत. त्यापैकी 2 पदे संस्थात्मक व 1 पद संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता याप्रमाणे एकूण 3 पदे आरक्षित होत आहेत. |
| ड)दिव्यांग (4%) | मागील भरतीवर्ष सन 2019 मधील 10 पदे व सन 2023-24 मधील 10 पदे अशी एकूण 20 पदे दिव्यांगांकरिता आरक्षित होत असून ती पुढील प्रमाणे आहे.<br>दिव्यांग प्रकार 'अ' - 05 पदे 'ब' - 05 पदे 'क' - 05 पदे आणि 'ड' व 'इ '- 05 पदे |

Mahabharti.in

★ अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गातील 6 (अज) पदे एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.

◆दिव्यांग उमेदवारांनी पुढील नमूद शारीरिक पात्रता, दिव्यांग प्रकार व पदाची जबाबदारी व कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

| पदनाम | शारीरीक पात्रता | दिव्यांग प्रकार | | जबाबदारी व कर्तव्ये |
|---|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S-Sitting - बसणे<br>ST-Standing-उभे रहाणे<br>W-Walking- चालणे<br>BN-Bending- वाकणे<br>MF- Manipulation by Fingers- हातांच्या बोटांची हालचाल करणे<br>SE-Seeing – पहाणे<br>RW-Reading & Writing - वाचणे व लिहिणे<br>H-Hearing – ऐकणे<br>C-Communication-संवाद साधणे | अ | LV- Low vision - क्षीण दृष्टी | 1. महानगरपालिकेतील स्थापत्य विषयीची कामे करणे<br>2. कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे<br>3. प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण<br>4. कामांचा दर्जा तपासणे<br>5. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे |
| | | ब | D-Deaf - बहिरेपणा<br>HH- Hard Hearing - श्रवणशक्तीतील दोष | |
| | | क | OA- One Arm - एक हात<br>BA- Both Arms - दोन्ही हात<br>OL- One Leg - एक पाय<br>BL- Both Leg - दोन्ही पाय<br>DW- Dwarfism - वाढ खुंटणे<br>AAV- Acid Attack Victim - आम्ल हल्ला ग्रस्त | |
| | | ड | SLD-Specific Learning Disability -विशिष्ट शिक्षण अक्षमता<br>MI- Mental Illness -मानसिक आजार | |
| | | इ | MD involving (a) to (d)–Multiple Disability -बहुविकलांगता उपरोक्त (अ) ते (ड) | |

◆ परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गातर्गत OA,OL,BL, OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.

**ब) पदाचे नाव - कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत)**
**वेतनश्रेणी (सुधारित) - स्तर- M23 - रु. 41,800-1,32,300 + अनुज्ञेय भत्ते**
**एकूण रिक्त पदे - 130**
**गट - 'क'**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सावशैमा | आदुघ | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 3 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 1 | 7 | 4 | 6 | 15 | 43 |
| महिला (30%) | 4 | 3 | 0 | 1 | 2 | 1 | 1 | 6 | 4 | 5 | 13 | 40 |
| माजी सैनिक (15%) | 2 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 2 | 3 | 7 | 20 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 7 |
| खेळाडू ( 5%) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 7 |
| अंशकालीन (पदवीधर उमेदवार) 10% | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 2 | 4 | 12 |

Mahabharti.in

| एकूण पदे | 12 | 10 | 1 | 3 | 5 | 2 | 2 | 20 | 13 | 18 | 44 | 130 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क) अनाथ मुले 1% | परिपत्रक क्र. एमबीसी/ 9476 दि. 26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ-2022/ प्रक्र. 122/का. 3 दि. 06.04.2023 मधील निदेशानुसार उपलब्ध एकूण 130 पदावर 1 पद आरक्षित होत आहे. सदरचे 1 पद संस्थात्मक प्रवर्गाकरिता आरक्षित होत आहे. | | | | | | | | | | | |
| ड)दिव्यांग (4%) | मागील भरतीवर्ष सन 2019 मधील 04 पदे व सन 2023-24 मधील 05 पदे अशी एकूण 09 पदे दिव्यांगांकरिता आरक्षित होत असून ती पुढील प्रमाणे आहे.<br>दिव्यांग प्रकार 'अ' - 3 पदे 'ब' - 2 पदे 'क' - 2 पदे आणि 'ड' व 'इ'- 2 पदे | | | | | | | | | | | |

- दिव्यांग उमेदवारांनी पुढील नमूद शारीरिक पात्रता, दिव्यांग प्रकार व पदाची जबाबदारी व कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

| पदनाम | शारीरीक पात्रता | दिव्यांग प्रकार | | जबाबदारी व कर्तव्ये |
|---|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) | S-Sitting - बसणे<br>ST-Standing- उभे रहाणे<br>W-Walking- चालणे<br>BN-Bending- वाकणे<br>KC-Kneeling and Crouching - गुडघे टेकून बसणे व वाकणे<br>MF- Manipulation by Fingers - हातांच्या बोटांची हालचाल करणे<br>PP-Pulling & Pushing -खेचणे व ढकलणे<br>RW-Reading & Writing - वाचणे व लिहिणे<br>SE-Seeing — पहाणे<br>H-Hearing — ऐकणे<br>C-Communication - संवाद साधणे | अ | LV- Low vision - क्षीण दृष्टी | 1. महानगरपालिकेतील यांत्रिकी व विद्युत विषयीची कामे करणे<br>2. कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे<br>3. प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण<br>4. कामांचा दर्जा तपासणे<br>5. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे |
| | | ब | D-Deaf - बहिरेपणा<br>HH- Hard Hearing - श्रवणशक्तीतील दोष | |
| | | क | OA- One Arm - एक हात<br>BA- Both Arms - दोन्ही हात<br>OL- One Leg - एक पाय<br>LC- Leprosy Cured<br>DW- Dwarfism - वाढ खुंटणे<br>AAV- Acid Attack Victim - आम्ल हल्ला ग्रस्त | |
| | | ड | ASD(M)-Autism Spectrum Disorder (Mild)- स्वमग्नता (सौम्य)<br>SLD-Specific Learning Disability -विशिष्ट शिक्षण अक्षमता<br>MI- Mental Illness -मानसिक आजार | |
| | | इ | MD involving (a) to (d)—Multiple Disability -बहु विकलांगता उपरोक्त (अ) ते (ड) | |

- परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गातर्गत OA,OL,BL, OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.

**क) पदाचे नाव** - **दुय्यम अभियंता (स्थापत्य) -**
**वेतनश्रेणी (सुधारित )** - **स्तर - M25 - रु. 44,900 -1,42,400 + अनुज्ञेय भत्ते**
**एकूण रिक्त पदे** - **233**
**गट** - **'ब'**

Mahabharti.in

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सावशैमा | आदुघ | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 14 | 9 | 3 | 1 | 6 | 4 | 5 | 31 | 15 | 15 | 50 | 153 |
| महिला (30%) | 7 | 4 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 14 | 7 | 7 | 23 | 70 |
| खेळाडू ( 5%) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | 10 |
| **एकूण पदे** | **22** | **14***  | **4** | **2** | **8** | **6** | **7** | **47** | **23** | **23** | **77** | **233** |
| क) अनाथ मुले 1% | परिपत्रक क्र. एमबीसी/ 9476 दि. 26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ-2022/ प्रक्र. 122/का. 3 दि. 06.04.2023 मधील निदेशानुसार उपलब्ध एकूण 233 पदावर 2 पदे आरक्षित होत आहे. सदरचे 1 पद संस्थात्मक व 1 पद संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता याप्रमाणे एकूण 2 आरक्षित होत आहेत. | | | | | | | | | | | |
| ड)दिव्यांग (4%) | भरतीवर्ष सन 2023-24 मधील 9 पदे दिव्यांगांकरिताआरक्षित होत असून ती पुढीलप्रमाणे आहेत.<br>दिव्यांग प्रकार 'अ' - 03 पदे 'ब' - 02 पदे 'क' - 02 पदे आणि 'ड' व 'इ'- 02 पदे | | | | | | | | | | | |
| * अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्याची कार्यवाही सुरु असलेल्या दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गातील 5 (अज) पदे एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत. | | | | | | | | | | | | |

◆ दिव्यांग उमेदवारांनी पुढील नमूद शारीरिक पात्रता, दिव्यांग प्रकार व पदाची जबाबदारी व कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

| **पदनाम** | **शारीरीक पात्रता** | **दिव्यांग प्रकार** | | **जबाबदारी व कर्तव्ये** |
|---|---|---|---|---|
| दुय्यम अभियंता (स्थापत्य) | S-Sitting - बसणे<br>ST-Standing- उभे रहाणे<br>W-Walking- चालणे<br>BN-Bending- वाकणे<br>MF- Manipulation by Fingers - हातांच्या बोटांची हालचाल करणे<br>SE-Seeing — पहाणे<br>RW-Reading & Writing - वाचणे व लिहिणे<br>H-Hearing — ऐकणे<br>C-Communication - संवाद साधणे | अ | LV- Low vision - क्षीण दृष्टी | 1. महानगरपालिकेतील स्थापत्य विषयीची कामे करणे<br>2. कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे<br>3. प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण<br>4. कामांचा दर्जा तपासणे<br>5. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे |
| | | ब | D-Deaf - बहिरेपणा<br>HH- Hard Hearing - श्रवणशक्तीतील दोष | |
| | | क | OA- One Arm - एक हात<br>BA- Both Arms - दोन्ही हात<br>OL- One Leg - एक पाय<br>BL- Both Leg - दोन्ही पाय<br>DW- Dwarfism - वाढ खुंटणे<br>AAV- Acid Attack Victim - आम्ल हल्ला ग्रस्त | |
| | | ड | SLD-Specific Learning Disability -विशिष्ट शिक्षण अक्षमता<br>MI- Mental Illness -मानसिक आजार | |
| | | इ | MD involving (a) to (d)—Multiple Disability -बहु विकलांगता उपरोक्त (a) ते (d) | |

◆ परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गातर्गत OA,OL,BL, OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.

Mahabharti.in

**ड) पदाचे नाव** - **दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) -**

**वेतनश्रेणी (सुधारित )** - **स्तर - M25 - रु. 44,900 -1,42,400 + अनुज्ञेय भत्ते**

**एकूण पदे** - **77**

**गट** - **'ब'**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सावशैमा | आदुघ | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 10 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 6 | 6 | 6 | 16 | 51 |
| महिला (30%) | 5 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 8 | 23 |
| खेळाडू ( 5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 3 |
| **एकूण पदे** | **16** | **4** | **2** | **2** | **1** | **1** | **0** | **10** | **8** | **8** | **25★** | **77** |
| क) अनाथ मुले 1% | परिपत्रक क्र. एमबीसी/ 9476 दि. 26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन व महिला बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ-2022/ प्रक्र. 122/का. 3 दि. 06.04.2023 मधील निदेशानुसार उपलब्ध एकूण 77 पदावर 1 पद आरक्षित होत आहे. सदरचे 1 पद संस्थात्मक प्रवर्गाकरिता आरक्षित होत आहेत. | | | | | | | | | | | |
| ड)दिव्यांग (4%) | भरती वर्ष सन 2023-24 मधील 3 पदे दिव्यांगांकरिता आरक्षित होत असून ती पुढीलप्रमाणे आहेत.<br>दिव्यांग प्रकार 'अ' - 1 पद 'ब' - 1 पद व 'क' - 1 पद | | | | | | | | | | | |
| ★ अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्याची कार्यवाही सुरु असलेल्या दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गातील 2 (खुला) पदे एकूण रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत. | | | | | | | | | | | | |

◆ दिव्यांग उमेदवारांनी पुढील नमूद शारीरिक पात्रता, दिव्यांग प्रकार व पदाची जबाबदारी व कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.

| पदनाम | शारीरीक पात्रता | दिव्यांग प्रकार | | जबाबदारी व कर्तव्ये |
|---|---|---|---|---|
| दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) | S-Sitting - बसणे<br>ST-Standing- उभे रहाणे<br>W-Walking- चालणे<br>BN-Bending- वाकणे<br>KC-Kneeling and Crouching - गुडघे टेकून बसणे व वाकणे<br>PP-Pulling & Pushing -खेचणे व ढकलणे<br>MF- Manipulation by Fingers - हातांच्या बोटांची हालचाल करणे<br>RW-Reading & Writing - वाचणे व लिहिणे<br>SE-Seeing – पहाणे<br>H-Hearing – ऐकणे<br>C-Communication - संवाद साधणे | अ | LV- Low vision - क्षीण दृष्टी | 1. महानगरपालिकेतील यांत्रिकी व विद्युत विषयीची कामे करणे<br>2. कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे<br>3. प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण<br>4. कामांचा दर्जा तपासणे<br>5. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे |
| | | ब | D-Deaf - बहिरेपणा<br>HH- Hard Hearing - श्रवणशक्तीतील दोष | |
| | | क | OA- One Arm - एक हात<br>BA- Both Arms - दोन्ही हात<br>OL- One Leg - एक पाय<br>LC- Leprosy Cured<br>DW- Dwarfism - वाढ खुंटणे<br>AAV- Acid Attack Victim - आम्ल हल्ला ग्रस्त | |
| | | ड | ASD(M)-Autism Spectrum Disorder (Mild)- स्वमग्नता (सौम्य)<br>SLD-Specific Learning Disability -विशिष्ट शिक्षण अक्षमता<br>MI- Mental Illness -मानसिक आजार | |
| | | इ | MD involving (a) to (d)–Multiple Disability -बहु विकलांगता उपरोक्त (अ) ते (ड) | |

Mahabharti.in

- परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गांतर्गत OA,OL,BL, OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.

**टिप -**

1. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
2. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अंशत: / पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार **आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका** यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
3. सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.
4. दिव्यांग उमेदवारांनी संबंधित पदांची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता व दिव्यांग प्रकार याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संदर्भित करून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. दिव्यांग प्रवर्गातील उमदेवारांनी सक्षम प्राधिका-याचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. 40 % पेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
5. दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे खुल्या प्रवर्गातील उपलब्ध पदांमधून रिक्त ठेवण्यात येतील.
6. दिव्यांग पदसुनिश्चितीनुसार विहित पात्रता धारण करणारे दिव्यांग उमेदवार त्या त्या जात प्रवर्गात तसेच सर्वसाधारण गटातून अर्ज करू शकतात व ते गुणवत्तेनुसार सर्वसाधारण गटातून निवडीस पात्र ठरु शकतात व त्यावेळेस त्यांना सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे सेवा शर्ती लागू राहतील.
7. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागास वर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/2867 दि. 11.11.2021 सोबतचा महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि.05.10.2021 अन्वये प्राप्त निर्देशानुसार व विशेष सूचनांनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेप्रमाणे लेखनिक व इतर सोयी-सवलती लागू राहतील
8. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरिता वित्तीय वर्ष 2022-2023/ 2023-2024 करिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16 अ दि.12.02.2019 व दि.31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
9. एका उमेदवारास एका पदासाठी एकच अर्ज सादर करता येईल. कोणत्याही उमेदवाराने एकाच पदासाठी एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास त्यामधील अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राहय धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल.
10. मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील. परंतु, एकाच उमेदवाराचे एकापेक्षा जास्त अर्ज विचारात घेता येणार नाहीत.
11. अराखीव (खुला) पदांकरिता उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.
12. परिपत्रक क्र. एमबीसी/ 664 दि. 21.07.2023 सोबत संलग्नित शासन निर्णय क्र. तृतीय-2022/ प्र.क्र. 379/ सामासु दि. 03.03.2023 अन्वये तृतीयपंथी या घटकातील वर्गास लिंग पर्यायांमध्ये 'स्त्री', 'पुरूष' यासोबत 'तृतीयपंथी' हा पर्याय ऑनलाईन अर्जात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

Mahabharti.in

2) **सामाजिक व समांतर आरक्षण -**

2.1 शासन निर्णय क्र. राआधो 4024/प्र.क्र. 14/16-ब दि. 25.01.2024 मधील सूचनांनुसार समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

2.2 **महिलांसाठी 30%** प्रमाणे आरक्षित पदे, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.82/2001/मसेक्षा2000/प्र.क्र.415/का.2 दि.25.05.2001 अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला आरक्षणांतर्गत अर्ज केलेला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरुष / तृतीयपंथी उमेदवारांमधून भरण्यात येतील.

2.3 **माजी सैनिकांसाठी 15%** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीए-1079/0/482/16-अ, दि. 16.04.1981 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. शासन निर्देशानुसार,माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास अशी पदे सदर भरती वर्षाकरिता रिक्त ठेवण्यात येतील. माजी सैनिकांकरिता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील. माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांना जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत, प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

2.4 **प्रकल्पग्रस्तांसाठी 5%** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 - सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 नुसार शासनाने विहित केलेल्या नियमाच्या अनुषंगाने, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एईएम-1080/35/16-अ दि.21.01.1980 तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर मार्गदर्शक तत्वानुसार, नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी पदे आरक्षित आहेत व ठाणे जिल्ह्यातील भातसा धरण प्रकल्पासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.231 दि.01.12.2020 अन्वये मंजूर झालेल्या 28 प्रकल्पग्रस्तांची गणना यामध्ये करण्यात येईल. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

2.5 **भूकंपग्रस्तांसाठी 2%** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भूकंप 1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि.27.08.2009 आणि शासन निर्णय क्र.भूकंप-1008/प्र.क्र.145/2008/16-अ दि.27.10.2008 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. तसेच, शासन निर्णय क्र.विकाक 2215/प्र.क्र.337/16-अ दि. 04.11.2016 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार भूकंपग्रस्तासाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे प्रकल्पग्रस्तांमधून भरण्यात येतील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या ओदशानुसार भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

2.6 **खेळाडुंसाठी 5%** प्रमाणे आरक्षित पदे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एमपीएम विभागाचे परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/1260 दि. 31.01.2017 सोबतचा महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/क्रीयुसे-2 दि. 01.07.2016 तसेच सम क्रमांकाचे शासन शुध्दीपत्रक दि.18.08.2016 आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2 दि.30.06.2022 मधील दिलेल्या निर्देशानुसार शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 अन्वये सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्या वेळीच विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता, संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

खेळाडु आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांच्या राज्य/ राष्ट्रीय स्पर्धेच्या प्रमाणपत्राबाबत शंका उद्भवल्यास आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडुन विचारणा करण्यात येईल(शंका उद्भवल्याप्रकरणी विभागीय

Mahabharti.in

उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील प्रमाणपत्र पडताळणी नंतर नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.)

2.7 **अंशकालीन पदवीधर /पदविकाधारक (सुशिक्षित बेरोजगार) 10%** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासनाच्या 'सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य' ह्या योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या कार्यालयात तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी 10% समांतर आरक्षण लागू करण्यात आले असून, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पअंक-1009/प्र.क्र.200/2009/16-अ दि.27.10.2009, शासन निर्णय क्र. अंशका 1913/प्र.क्र.57/2013/16-अ दि.19.09.2013 व शासन निर्णय क्र.अंशका 1918/प्र.क्र.507/16-अ दि.02.01.2019 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर /पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांकरिताचे आरक्षण राहील.

2.8 **दिव्यांग आरक्षण 4%** प्रमाणे आरक्षित पदे, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/ प्र.क्र. 114/16-अ दि. 29.05.2019 तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या ओदशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेली पदे भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी असतील. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/604 दि. 29.04.2021 सोबतचा महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि. 16.04.2021 मधील निर्देशानुसार, सदर संवर्गाकरिता दिव्यांगाची पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. सदरचा तपशील अनु क्र. 1 (ड) तक्त्यात नमूद करण्यात आला आहे. लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. परिपत्रक क्र. एमबीसी/3976 दि.10.04.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.

2.9 **अनाथांकरिता 1 %** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क.122/का-03 दि.06.04.2023, सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि. 10.05.2023 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. प्रस्तुत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एमबीसी /2969 दि. 11.01.2024 सोबतच्या शासन पूरकपत्र क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि. 10.05.2023 अन्वये, भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

तसेच अनाथ व्यक्तींचे आरक्षण यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार राहील. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

2.10 **सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग सरळसेवेने भरण्यात येणारी 10%** प्रमाणे आरक्षित पदे, सन 2024 चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्रमांक 16, दि.26.02.2024 अन्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास

Mahabharti.in

वर्गाकरिता आरक्षण अधिनियम 2024 मधील निर्देशांनुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागसवर्गाची (सा.शै.मा.व.) रिक्त पदे भरण्यात येतील. त्याचप्रमाणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एमबीसी / 5665 दि. 16.08.2024 सोबतच्या शासन शुध्दिपत्रक क्र. बीसीसी-2024/प्र.क्र.75/आरक्ष-5 दि. 28.06.2024 मधील निर्देशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्ज करावयाच्या दिनांका पूर्वीचे सदर शुध्दिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या नमून्यातील सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. यासंदर्भात शासनाकडुन वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गातील उमेदवारांकरिताचे आरक्षण राहील. प्रस्तृत भरती प्रक्रियेअंतर्गत कनिष्ठ अभियंता/दुय्यम अभियंता पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि. 19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

2.11 **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ई.डब्लू.एस.) सरळसेवेने भरण्यात येणारी 10%** प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो/4019/प्र.क्र 31/16 अ दि.12.02.2019 व सम क्रमांकाचा शासन निर्णय दि. 31.5.2021 मधील निर्देशानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची (ईडब्ल्युएस) रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच, सदर शासन निर्णय आणि शासन परिपत्रक क्र.राआधो2023/प्र.क्र.40/16-अ दि. 23.03.2023 मधील निर्देशानुसार विहित करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहिल.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसिलदार यांनी वितरित केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरती करिता वापरता येणार नाही.

2.12 बृहन्मंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/9520 दि.11.04.2001 सोबतचा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-1997/प्र.क्र.63/97/16-ब दि. 18.10.1997 मधील निर्देशानुसार , विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून, आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार, गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

2.13 आरक्षण / अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

## 3) <u>शैक्षणिक अर्हता -</u>

### 3.1 <u>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:-</u>

**दिनांक - 01.11.2024 पर्यंत**

3.1.1 उमेदवाराने एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर 3 वर्षाची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग मधील पदविका संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी / कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे, अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

(दोन) उपरोक्त अनु क्र.2 मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

3.1.2 उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

Mahabharti.in

3.1.3 खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

3.1.4 उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**तळटिप - उपरोक्त नमूद कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदांच्या शैक्षणिक अर्हतेमधील बाब क्र. 3.1.2 येथे नमूद केल्यानुसार ''त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.'' ही बाब महानगरपालिका कर्मचा-यांसाठी लागू राहिल.**

**3.2 <u>कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:-</u>**
**दिनांक - 01.11.2024 पर्यंत**

3.2.1 उमेदवाराने किमान एस.एस.सी वा समकक्ष परीक्षेनंतर 3 वर्षाची यांत्रिकी विद्युत / ऑटोमोबाईल / इलेक्ट्रॉनिक्स / प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदविका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम / डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रॉनिक्स / डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रुमेंटेशन / डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग संपादित केलेली असावी.

(एक) कनिष्ठ अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदविका प्राप्त करणा-या उमेदवारांनी / कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थांना अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापिठांमधून पदविका प्राप्त करणे आवश्यक आहे.

(दोन) उपरोक्त 3.2.1 मध्ये नमूद अर्हतांशी समकक्ष अर्हता असल्यास उमेदवाराने खाजगी स्वायत्त महाविद्यालयातून प्राप्त केलेली पदविका तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पदविकेशी समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Equivalence Certificate) नियुक्ती आदेशापुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

3.2.2 उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

3.2.3 खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

Mahabharti.in

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

3.2.4 उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाचा वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**तळटिप - उपरोक्त नमूद कनिष्ठ अभियंता (<u>यांत्रिकी व विद्युत</u>) या पदांच्या शैक्षणिक अर्हतेमधील बाब क्र. 3.2.2 येथे नमूद केल्यानुसार ''त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.'' ही बाब महानगरपालिका कर्मचा-यांसाठी लागू राहिल.**

**3.3 <u>दुय्यम अभियंता (स्थापत्य) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:</u>**
**दिनांक - 01.11.2024 पर्यंत**

3.3.1 (अ)ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

अ) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की, ज्यांनी (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परीक्षा देऊन त्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयूट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ब)दुय्यम अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणा-या उमेदवारांनी /कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE)/तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापीठामधून पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

3.3.2 उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

Mahabharti.in

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका(सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण तसेच, राज्यशासनाने /बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

3.3.3 उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**तळटिप :**

1. **उपरोक्त नमूद दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदांच्या शैक्षणिक अर्हतेमधील बाब क्र. 3.4.3 येथे नमूद केल्यानुसार ''त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.'' ही बाब महानगरपालिका कर्मचा-यांसाठी लागू राहिल.**
2. 'असोसिएट मेंबर ऑफ द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स परीक्षेचे भाग ए व बी (AMIE) धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत सदस्यत्व प्रमाणपत्राचा लाभ केवळ दि. 31.05.2013 पूर्वी AMIE अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनाच दिला जाईल.'

**3.4 पदनाम - दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाकरिताची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:**
**दिनांक - 01.11.2024 पर्यंत**

3.4.1 (अ) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापिठाची यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील पदवी/इलेक्ट्रॉनिक्स/प्रॉडक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा बॅचलर इन इंजिनिअरींग (इलेक्ट्रॉनिक्स आणि पॉवर इंजिनिअरीग) महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग 'ए 'व 'बी' या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (यांत्रिकी व विद्युत) किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील परीक्षा देवून ज्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयुट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ब)दुय्यम अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) /तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था /विद्यापीठामधून पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

3.4.2 उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे,अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या

Mahabharti.in

अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण, तसेच राज्यशासनाने / बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

3.4.3 उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**<u>तळटिप :</u>**

1. **उपरोक्त नमूद दुय्यम अभियंता (<u>यांत्रिकी व विद्युत</u>) या पदांच्या शैक्षणिक अर्हतेमधील बाब क्र. 3.4.3 येथे नमूद केल्यानुसार ''त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.'' ही बाब महानगरपालिका कर्मचा-यांसाठी लागू राहिल.**
2. 'असोसिएट मेंबर ऑफ द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स परीक्षेचे भाग ए व बी (AMIE) धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत सदस्यत्व प्रमाणपत्राचा लाभ केवळ दि. 31.05.2013 पूर्वी AMIE अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनाच दिला जाईल.'

**4) <u>वयोमर्यादा</u> - (<u>जाहिरातीतील नमूद सर्व पदांसाठी</u>)**

**जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास, उमेदवार खालील नमूद केलेल्या विहित वयोमर्यादेतील असावा.**

**अ) अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे**

**ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान 18 वर्षे व कमाल 43 वर्षे**

**दिनांक - 01.11.2024 पर्यंत**

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1. | अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/ कार्या.12 दि.25.04.2016 मधील तरतूदीनुसार किमान 18 वर्षांपेक्षा कमी व कमाल 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे. |
| 2. | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/ कार्या.12 दि.25.04.2016 मधील तरतूदीनुसार किमान 18 वर्षांपेक्षा कमी व कमाल 43 वर्षांपेक्षा जास्त नसावे. |
| 3. | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र. मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ दि.20.08.2010 मधील तरतूदीनुसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.<br>तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षेपर्यंत राहील. |
| 4. | प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र. प्रकल्प-1006/मु.स.396/प्र.क्र.56/06/16-अ, दि.03.02.2007 मधील तरतूदीनुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. |
| 5. | खेळाडू उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रिधो-2002/ |

Mahabharti.in

| | | |
|---|---|---|
| | | प्र.क्र.68/ क्रीयुसे-2 दि.01.07.2016 मधील तरतूदीनुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी विहीत असलेल्या वयोमर्यादेत 05 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि, वयोमर्यादेत 05 वर्षासाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा 43 वर्षे राहील. |
| 6. | अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक (सुशिक्षित बेरोजगार) उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र.अशंका 1918 / प्र.क्र.507/16-अ दि.02.01.2019 मधील तरतूदीनुसार कमाल वयोमर्यादा 55 वर्षे राहील. |
| 7. | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र.एसआरव्ही-1098 प्र.क्र.39/98-16-अ दि.16.06.2001 मधील तरतूदीनुसार उच्चतम वयोमर्यादा सरसकट 45 वर्षे इतकी राहील. तथापि, दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान दिव्यांगात्वाचे प्रमाण 40% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. |
| 8. | अनाथ उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि.06.04.2023 मधील तरतूदीनुसार अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवारांना अनुसूचित जाती, या प्रवर्गातील उमेदवारांकरिता असलेली 43 वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील. |
| 9. | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निवक-1010/ प्र.क्र.08 /2010/16-अ दि.06.10.2010 मधील दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकीच राहील. सरसकट वयोमर्यादा शिथिल केली असल्याने, या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे इतकीच राहील. |

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा वर्षे | कमाल वयोमर्यादा वर्षे |
|---|---|---|---|
| 1. | अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारासाठी | 18 | 38 |
| 2. | मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 3. | माजी सैनिक उमेदवारासाठी | सशस्त्र दलात केलेली सेवा+ 3 वर्षे | |
| 4. | माजी सैनिक (दिव्यांग) उमेदवारासाठी | 45 | |
| 5. | प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 6. | भूकंपग्रस्त उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 7. | खेळाडू उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 8. | अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक (सुशिक्षित बेरोजगार) उमेदवारासाठी | 18 | 55 |
| 9. | अनाथ उमेदवारासाठी | 18 | 43 |
| 10. | दिव्यांग उमेदवारासाठी | 18 | 45 |
| 11. | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवार | 18 | 45 |

★ तथापि, उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणारे वि.जा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार, मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र

Mahabharti.in

नाहीत.

★ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसाठी वयोमर्यादेची अट लागू नाही. तथापि, त्यांनी अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीचे खाते प्रमुखांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे अनिवार्य राहील.

**5) <u>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदाकरिता निवडीचे निकष -</u>**

a) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदासाठी सेवा प्रवेश नियमानुसार विहीत केलेली अर्हता व अटी/शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा संगणकावर घेण्यात येईल. सदर परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या सामाईक गुणवत्ता यादीनुसार विहीत सामाजिक / समांतर आरक्षणानुसार तात्पुरती / अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

b) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदासाठी निवडीचे निकषाअंतर्गत टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे -

| **अर्हकारी परीक्षा** | **प्रवर्ग** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत)** | | |
| एस. एस. सी. | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गासाठी | 45% |
| पदविका (AICTE/DTE मान्यता प्राप्त संस्थेतून) | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गासाठी | 45% |

c) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदाकरिता घेण्यात येणा-या बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये खालील वस्तुनिष्ठ प्रश्नपध्दतीचा अंतर्भाव असेल -

| अ.क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ | परीक्षेचे स्वरुप | एकूण गुण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य ज्ञान | 20 | 20 | 90 मिनिटे | वस्तुनिष्ठ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत ) या पदासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास ऑनलाइन परीक्षेतील एकूण गुणांपैकी किमान 45 टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. |
| 2 | बौध्दिक क्षमता | 20 | 20 | | | |
| 3 | तांत्रिक ज्ञान | 60 | 60 | | | |
| एकूण | | 100 | 100 | | | |

**<u>महत्त्वाच्या सूचना</u> -**

1. कनिष्ठ अभियंता पदांकरिता घेण्यात येणा-या परीक्षेचा दर्जा भारतातील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) व तंत्रशिक्षण संचालनालय (DTE) या मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदविका परीक्षेच्या समान राहील.
2. सर्व परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येतील.
3. प्रत्येक प्रश्न एक मार्काचा असेल. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/4 गुण वजा करण्यात येतील.
4. मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही.
5. ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार केलेल्या सामाईक गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षणानुसार तात्पुरती/ अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
6. सामाईक गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान गुण असल्यास पुढील निकष लागू राहील.

   अ दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान गुण असल्यास पदविका परीक्षेमध्ये प्राप्त झालेले गुण

   ब उपरोक्त'अ' प्रमाणे गुण समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.

Mahabharti.in

क  वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा क्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

७. उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना रहातील.

८. संबंधित विद्यापीठ/संस्थेने पदविका प्रदान करताना विहित केलेले गुण विचारात घेण्यात येतील.

९. ज्या उमेदवारांना पदविका प्रदान करताना विद्यापीठ/संस्था यांनी गुणपध्दतीऐवजी  श्रेणी पध्दती वापरली आहे, त्यांच्या बाबतीत मिळालेल्या श्रेणीचे टक्केवारीमध्ये खालीलप्रमाणे रुपांतर करण्यात येईल.

i. उमेदवारांच्या गुणपत्रिकेवर टक्केवारीत रुपांतर करण्यासाठी सुत्र दिले असल्यास, टक्केवारी ही संबंधित संस्था/ विद्यापीठ यांच्या नियमावलीनुसार ग्राह्य धरली जाईल.

ii. संबंधित विद्यापीठ / संस्था यांनी उमेदवारांच्या गुणपत्रिकेवर टक्केवारीत रुपांतर करण्यासाठी  सूत्र दिले नसल्यास अशा उमेदवारांसाठी,

**(नमूद केलेली श्रेणी – 0.75) X 10 हे सूत्र वापरून टक्केवारी काढण्यात येईल.**

**6)  दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता(यांत्रिकी व विद्युत) या पदाकरिता निवडीचे निकष –**

a) दुय्यम अभियंता (स्थापत्य) आणि दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेली अर्हता, अटी व शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा संगणकावर घेण्यात येईल सदर परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या सामाईक गुणवत्ता यादीनुसार विहीत, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार तात्पुरती/ अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

b) दुय्यम अभियंता (स्थापत्य) आणि दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदांसाठी निवडीचे निकषाअंतर्गत टक्केवारी पुढीलप्रमाणे  आहे -

| अर्हकारी परीक्षा | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| दुय्यम अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) | | |
| एस. एस. सी. | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |
| एच.एस.सी. किंवा पदविका | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |
| पदवी (AICTE/DTE मान्यता प्राप्त संस्थेतून ) | खुला | 50% |
| | सर्व मागासवर्गीय प्रवर्गांसाठी | 45% |

Mahabharti.in

दुय्यम अभियंता (स्थापत्य) आणि दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत)या पदांकरिता घेण्यात येणा-या ऑनलाईन परीक्षेमध्ये पुढीलप्रमाणे वस्तुनिष्ठ प्रश्न - पध्दतीचा अंर्तभाव असेल.

| अ.क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ | स्वरुप | एकूण गुण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य ज्ञान | 20 | 20 | 90 मिनिटे | वस्तुनिष्ठ | दुय्यम अभियंता (स्थापत्य) आणि दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास ऑनलाइन परीक्षेतील एकूण गुणांपैकी किमान 45 टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. |
| 2 | बौध्दिक क्षमता | 20 | 20 | | | |
| 3 | तांत्रिक ज्ञान | 60 | 60 | | | |
| | एकूण गुण | 100 | 100 | 90 मिनिटे | | |

**महत्वाच्या सूचना –**

1. दुय्यम अभियंता पदांकरिता घेण्यात येणा-या परीक्षेचा दर्जा भारतातील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) व

तंत्रशिक्षण संचालनालय (DTE) या मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या समान राहील.

2. सर्व परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येतील.
3. प्रत्येक प्रश्न एक मार्काचा असेल. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/4 गुण वजा करण्यात येतील.
4. मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही.
5. ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार केलेल्या सामाईक गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षणानुसार तात्पुरती/ अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
6. सामाईक गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान गुण असल्यास पुढील निकष लागू राहील.
   - अ अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली संबंधित अभियांत्रिकी शाखेतील उच्च शैक्षणिक अर्हता
   - ब उपरोक्त 'अ'प्रमाणे समान असल्यास उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक
   - क उपरोक्त'अ' व 'ब' प्रमाणे समान असल्यास पदवी परीक्षेमध्ये प्राप्त झालेले गुण
   - ड उपरोक्त'अ','ब' व 'क' प्रमाणे गुण समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.
   - इ वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा क्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.
7. उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना रहातील.
8. संबंधित विद्यापीठ/संस्थेने पदवी प्रदान करताना विहित केलेले गुण विचारात घेण्यात येतील.
9. ज्या उमेदवारांना पदवी प्रदान करताना विद्यापीठ/संस्था यांनी गुणपध्दतीऐवजी श्रेणी पध्दती वापरली आहे, त्यांच्या बाबतीत मिळालेल्या श्रेणीचे टक्केवारीमध्ये खालीलप्रमाणे रुपांतर करण्यात येईल.
   - i उमेदवारांच्या गुणपत्रिकेवर टक्केवारीत रुपांतर करण्यासाठी सुत्र दिले असल्यास, टक्केवारी ही संबंधित संस्था/ विद्यापीठ यांच्या नियमावलीनुसार ग्राह्य धरली जाईल.
   - ii संबंधित विद्यापीठ / संस्था यांनी उमेदवारांच्या गुणपत्रिकेवर टक्केवारीत रुपांतर करण्यासाठी सूत्र दिले नसल्यास अशा उमेदवारांसाठी,

     **(नमूद केलेली श्रेणी – 0.75 X 10) हे सूत्र वापरून टक्केवारी काढण्यात येईल.**

**7) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य),कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गातील रिक्त पदांच्या निवडीकरिता खालील बाबींची नोंद उमेदवारांने घेणे आवश्यक राहील.**

1. निवडीच्या निकषानुसार ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे म्हणजेच गुणवत्तेनुसार प्रथम सामाईक गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सामाईक गुणवत्ता यादीच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणी सापेक्ष सामाजिक व समांतर आरक्षणाचा विचार करुन तात्पुरती निवड यादी तयार करण्यात येईल. तथापि, उमेदवारांच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषंगिक प्रमाणपत्रांची तसेच, अन्य कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
2. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव तात्पुरत्या निवड यादीतून रद्द करण्यात येईल.
3. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवार अनुपस्थित राहील्यास किंवा निवड प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यांना ई-मेल द्वारे सदरबाबतचे केवळ एकवार स्मरणपत्र पाठविण्यात येईल. तदनंतर देखील उमेदवाराने विहित वेळेत पूर्तता न केल्यास उमेदवारास संबंधित पदावरील नियुक्तीस स्वारस्य नसल्याचे गृहित धरुन त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदरबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
4. मागासवर्गीय उमेदवार असेल तर त्याला खुल्या किंवा तो ज्या प्रवर्गाच्या आरक्षणात मोडत असेल अशा एकाच प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज करता येईल.

Mahabharti.in

5. अराखीव (खुला) पदांकरिता उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जा मध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

6. दिव्यांग उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या व मागास प्रवर्गातील सर्व गुणवत्ताधारक उमेदवारांनी दिव्यांगाच्या संबंधित आरक्षित पदांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा.

**८) <u>ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पद्धत</u> -**

**अ. अर्ज नोंदणी.**

**ब. परीक्षा शुल्क भरणे.**

**क. आवश्यक कागदपत्रे स्कॅन व अपलोड करणे.**

★ ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यापूर्वी उमेदवाराने खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेणे -

1. खालील नमूद कागदपत्रे स्कॅन करून तयार ठेवावीत
   - अलीकडील रंगीत छायाचित्र (4.5 × 3.5 सेमी)
   - सही (काळया शाईच्या पेनाने)
   - डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा (पांढ-या कागदावर काळया किंवा निळया शाईने)
   - हाताने लिहिलेले घोषणापत्र (पांढ-या कागदावर काळया शाईच्या पेनाने) (मजकूर मुद्दा क्र. 4 येथे देण्यात आलेला आहे.)

2. कॅपिटल लेटर मधील उमेदवाराची सही स्विकारली जाणार नाही.

3. डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा सुस्पष्ट व ठळक स्कॅन केलेला असावा. (जर उमेदवाराला डाव्या हाताचा अंगठा नसेल तर उजव्या हाताच्या अंगठयाचा ठसा देण्यात यावा.)

4. घोषणापत्र मजकूर खालीलप्रमाणे आहे-

   I, ________ (candidates name), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required.'

5. वरील नमूद घोषणापत्र हे उमेदवाराच्या हस्ताक्षरातच व इंग्रजीमध्येच असणे आवश्यक आहे. जर ते इतर व्यक्तींच्या हस्ताक्षरात किंवा इतर भाषेत असेल तर सदर अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही. (दृष्टीदोष असलेले उमेदवारांनी त्यांचे घोषणापत्र टंकलिखित करून मजकूराच्या खाली डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा देऊन निर्देशानुसार कागदपत्रे अपलोड करावेत.)

6. ऑनलाईन शुल्क भरण्याकरीताची आवश्यक कागदपत्रे / माहिती तयार ठेवण्यात यावी.

7. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच, सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास तसेच, भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, **ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.** बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. **<u>एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज नोंदणी करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.</u>**

**अ) <u>ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u> -**

1. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

2. ऑनलाईन पध्दतीने करावयाचा अर्ज http://portal.mcgm.gov.in/forprospects/careers-All/Recruitment/City Engineer या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

3. उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळास भेट देऊन जाहिरातीमध्ये नमूद मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अर्ज सादर करावा.

4. ऑनलाईन अर्ज करतेवेळी उमेदवारांना काही अडचण निर्माण झाल्यास त्यांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी सकाळी 09.30 ते सायंकाळी 06.00 या वेळेत हेल्पलाईन क्र.1800222366/18001034566 व https://cgrs.ibps.in/ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

5. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता "Click here for new Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वत:कडे लिहून ठेवावा. तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.

6. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज SUBMIT करण्यापूर्वी उमेदवाराने "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. अंतिम SUBMIT करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य रितीने भरली असल्याची खात्री करुन घ्यावी. क्षीण दृष्टी असलेल्या उमेदवारांनी विशेष काळजी घेवून ऑनलाईन अर्जात माहिती भरावी व तपासून पहावी.

7. उमेदवाराने स्वत:चे/ वडिलांचे/ पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्र/ गुणपत्रक / ओळखपत्र यांवर नमूद केल्याप्रमाणे भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

8. उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व SAVE करण्यासाठी "Validate your details" आणि "SAVE AND NEXT" या बटनांचा वापर करावा.

9. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराचा फोटो व सही अपलोड करण्याची पध्दतीचा तपशील खालील 'क' मध्ये देण्यात आलेला आहे.

10. ''COMPLETE REGISTRATION'' टॅबवर क्लिक करण्यापूर्वी ''Preview'' टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.

11. आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्यरितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन ''COMPLETE REGISTRATION'' बटनवर क्लिक करावे.

12. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. एकदा ''COMPLETE REGISTRATION'' बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

13. ''Payment'' बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

14. त्यानंतर ''SUBMIT'' बटनावर क्लिक करावे.

**ब) <u>ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक</u> -**

| | | |
|---|---|---|
| ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | : | दि. 26.11.2024 ते 16.12.2024 ( वेळ रात्री 11.59.59 वाजेपर्यंत) |
| नेट बॅंकिंगद्वारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी | : | दि. 26.11.2024 ते 16.12.2024 ( वेळ रात्री 11.59.59 वाजेपर्यंत) |
| ऑन-लाईन परीक्षेचा दिनांक | : | http://portal.mcgm.gov.in/forprospects/Careers-All/Recruitment/CityEngineer या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल. |

**(वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.)**

Mahabharti.in

क) **<u>परीक्षा शुल्क भरणे</u>**

**परीक्षा शुल्क सर्व संवर्गातील उमेदवारांना खालीलप्रमाणे लागू राहील.**

- ★ **खुल्या प्रवर्गातील उमेदवार : रु. 1000/- (वस्तु व सेवाकरासह)**
- ★ **मागास प्रवर्गातील उमेदवार : रु. 900/- (वस्तु व सेवाकरासह)**

1. ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
2. परीक्षा शुल्क इंटरनेट बॅकिंग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड (UPI / Ru-pay/Visa/MasterCard/Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्डस किंवा Mobile Wallets द्वारेच भरता येईल. परीक्षा शुल्क ऑफलाईन पध्दतीने भरता येणार नाहीत.
3. ऑनलाईन परीक्षा शुल्काचे Submission केल्यानंतर थोडा वेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत Back किंवा Refresh बटन दाबु नये.
4. ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल.
5. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉगीन करुन परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही पुन्हा करावी लागेल.
6. नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती (E-Receipt) मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्ज मुद्रण करून (print) काढुन ठेवणे आवश्यक आहे. ई-पावती व ऑन लाईन अर्जाची प्रत भरती प्रक्रीयेच्या प्रत्येक टप्प्यात सादर करणे आवश्यक राहील.
7. Credit Card द्वारे परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी.
8. आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो (Browser Window) बंद करण्याची दक्षता घ्यावी.
9. ऑनलाईन शुल्क भरलेल्याचा तपशील असणा-या अर्जाची प्रिंट काढण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
10. ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. ऑनलाईन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकित प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

ड) **<u>आवश्यक कागदपत्रे स्कॅनकरून अपलोड करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना</u>** -

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने त्याचा छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्र पुढे दिल्याप्रमाणे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

**(a) <u>छायाचित्र</u> – (4.5cm x 3.5cm)**

* उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.
* सदरचे छायाचित्र फीकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
* कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे.
* सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी.
* फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
* चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे.
* छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
* फाईलचा प्रकार – jpg / jpeg

Mahabharti.in

Dimensions – 200 X 230 pixels

फाईलचा आकार – 20 kb – 50 kb

* छायाचित्राचा आकार 50kb पेक्षा जास्त नसावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे 50kb पेक्षा मोठे असेल तर स्कॅनरची सेटींग जसे की, डीपीआय रिजोल्युशन, नंबर ऑफ कलर इ. मध्ये बदल करून आकार लहान करण्यात यावा.

(b) **सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्र** -

* उमेदवाराने पांढ-या कागदावर काळया शाईच्या पेनाने सही करावी

  फाईलचा प्रकार – jpg / jpeg

  Dimensions – 140 X 60 pixels

  फाईलचा आकार 10 kb – 20 kb च्या दरम्यान असावा. फाईलचा आकार 20kb पेक्षा जास्त नसावा.

* कॅपिटल लेटर मधील उमेदवाराची सही स्विकारली जाणार नाही.

* उमेदवाराने पांढ-या कागदावर त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा काळ्या किंवा निळया शाईने उमटवावा.

  फाईलचा प्रकार – jpg / jpeg

  Dimensions – 240 X 240 pixels in 200 DPI म्हणजेच 3 X 3 सेमी (रुंदी X उंची)

  फाईलचा आकार – 20 kb – 50 kb

* डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा सुस्पष्ट व ठळक स्कॅन केलेला असावा. (जर उमेदवाराला डाव्या हाताचा अंगठा नसेल तर उजव्या हाताच्या अंगठयाचा ठसा देण्यात यावा.)

* उमेदवाराने स्वहस्ताक्षरात पांढ-या कागदावर काळया शाईच्या पेनाने घोषणापत्र लिहावे.

  फाईलचा प्रकार – jpg / jpeg

  Dimensions – 800 X 400 pixels in 200 DPI म्हणजेच 10 X 5 सेमी (रुंदी X उंची)

  फाईलचा आकार – 50 kb – 100 kb

* घोषणापत्र मजकूर पुढीलप्रमाणे आहे -

  I, _________ (candidates name), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required.'

* सही, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा व घोषणापत्र हे उमेदवाराचेच असावे. इतर कोणत्याही व्यक्तीचे असता कामा नये.

* उपस्थितीपट, प्रवेशपत्र व परीक्षेच्या वेळी घेण्यात येणारी सही हे ऑनलाईन अर्ज भरतीवेळी अपलोड केलेल्या सही सोबत जुळत नसतील तर उमेदवाराचा अर्ज व उमेदवारी रद्द केली जाईल.

* सही / घोषणापत्र हे कॅपिटल लेटर मध्ये असेल तर स्विकारले जाणार नाही.

(c) **कागदपत्रे स्कॅन करणे** -

* स्कॅनरचे रिझोल्युशन हे कमीतकमी 200 DPI (dots per inch) ठेवावे.

* कलर true colour निवडावा.

* फाईलचा आकार वर दिल्याप्रमाणे निवडावा.

* स्कॅन झालेला छायाचित्र/सही/डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा / घोषणापत्र हे काठापर्यंत सरळरेषेत crop करावे.

* छायाचित्राचा प्रकार हा JPG / JPEG पध्दतीमध्ये असावा. जसे की, फाईलचे नाव image01.jpg किंवा image01.jpeg अशा पध्दतीत असावे. फाईलचा आकार फाईलवर mouse pointer घेवून किंवा folder files listing करून तपासावे.

* MS WINDOW / MS-OFFICE वापरणारे उमेदवार MS Paint / MS-OFFICE picture manager वापरून फाइल .jpeg प्रकारात edit करू शकतात. स्कॅन केलेली फाईल 'File menu' मधील 'SAVE AS' पर्यायाचा उपयोग करून ती फाईल .jpg / .jpeg प्रकारात SAVE करू शकतात. फाईलचा आकार कमी -जास्त करण्याकरीता छायाचित्र Crop करून resize option चा उपयोग करावा.

Mahabharti.in

(d) **कागदपत्रे अपलोड करणे** -

* ऑनलाईन अर्ज भरताना छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
* सदर लिंकवर क्लिककरून छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्र अपलोड करावे.
* Browse करून छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व घोषणापत्र जेथे save केलेली आहे तेथे जावे.
* फाईलवर क्लिक करून सिलेक्ट करावे.
* 'Open / Upload' वर क्लिक करावे.
* फाईलचा आकार आवश्यकतेप्रमाणे नसेल तर error चा message येईल. error चा message आल्यास वर नमूद केल्याप्रमाणे फाईलचा आकार आवश्यकतेनुसार adjust करून फाईल पुन्हा अपलोड करण्याची कार्यवाही करावी.
* अपलोड केलेली फाईल preview करून छायाचित्राची गुणवत्ता तपासावी. preview मध्ये जर छायाचित्र फिक्कट / अस्पष्ट असेल तर आवश्यक बदलकरून पुन्हा सदर फाईल अपलोड करावी.
* तुमच्या ऑनलाईन अर्जात जोपर्यंत तुम्ही छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्र अपलोड करत नाही तोपर्यंत तुमचा अर्ज रजिस्टर केला जाणार नाही.

**टिप** -

1) जर अपलोड केलेल्या छायाचित्रामध्ये उमेदवाराचा चेहरा/सही / डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा/ हस्तलिखित घोषणापत्र अस्पष्ट असेल तर सदर ऑनलाईन अर्ज व उमेदवारी रद्द केली जाईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.
2) ऑनलाईन अर्ज submit करण्यापूर्वी अपलोड केलेली फाईल preview करून छायाचित्र, सही, डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा व हस्तलिखित घोषणापत्राची गुणवत्ता तपासावी. preview जर फिक्कट / अस्पष्ट असेल तर आवश्यक बदलकरून पुन्हा सदर फाईल अपलोड करावी.
3) ऑनलाईन अर्ज submit करण्यापूर्वी छायाचित्राच्या लिंक वर छायाचित्र, सहीच्या लिंकवर सही , डाव्या हाताच्या अंगठयाच्या ठस्याच्या लिंकवर ठसा व घोषणापत्राच्या लिंकवर घोषणापत्रच अपलोड झालेले आहे याची खात्री करावी. चुकीच्या लिंकवर चुकीची फाईल अपलोड झाली असल्यास उमेदवाराला ऑनलाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देता येणार नाही.
4) छायाचित्रामध्ये उमेदवाराचा चेहरा सुस्पष्ट असल्याची खातरजमा करावी.
5) उमेदवाराने फोटोच्या जागी स्वत:चा फोटो अपलोड न केल्यास उमेदवारास ऑनलाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देता येणार नाही. त्यासाठी स्वत: उमेदवार जबाबदार असेल.
6) उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पध्दत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.
7) **ऑनलाईन रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्ज मुद्रण करून (printout) स्वत:जवळ जपून ठेवणे आवश्यक आहे.**
8) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहित केलेल्या कालावधीत उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे.
9) उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरून शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.
10) उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, वैध ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकविल्यास त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

Mahabharti.in

11) उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाल्यानंतर त्याच्या ई-मेलआयडी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एसएमएसद्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाला नाही असे समजावे.

12) अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येतील.

13) वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

14) उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी, त्यामध्ये फेरफार करु नये.

15) उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

**9) <u>प्रवेशपत्र डाउनलोड करणे</u>**

ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित **Link** वर **Click** केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताची **Window** स्क्रीनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवाराने रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड/जन्मतारखेचा वापर करावा. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिटकवणे आवश्यक राहील.

**10) <u>परीक्षेला उशिरा येण्याबाबत</u>**

परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी ९० मिनिटे असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे इत्यादी बाबींच्या पूर्ततेसाठी परीक्षा कालावधीच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा स्थळी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

**11) <u>ओळख पटवणे</u>**

परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले (प्रवेशपत्रावर जे नाव दिसते तेच नाव असलेले) वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / (कायमस्वरुपी ) वाहनचालक परवाना (Permanent Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / बँकेचे फोटोसहीतचे पासबुक / फोटोसह अधिकृत लेटरहेडवर गॅझेटेड ऑफीसरनी जारी केलेला फोटो ओळख पुरावा /छायाचित्रासह अधिकृत लेटरहेडवर लोकप्रतिनिधीने जारी केलेला ओळखीचा पुरावा / छायाचित्रासह अधिकृत लेटरहेडवर महाविद्यालयाचे / विद्यापिठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / आधारकार्ड / ई-आधारकार्ड छायाचित्रासह / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही. **(शिधापत्रिका (रेशन कार्ड) व शिकाऊ वाहन परवाना (Learner's Driving License) परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.)**

**<u>टिप:-</u>** परीक्षा केंद्रावर परीक्षसाठी उपस्थित होत असताना, उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, (छायांकित प्रतीसह) परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले असेल, त्यांनी नावात बदल झाल्याबाबतचे मूळ राजपत्र अधिसूचना/ मूळ विवाह नोंदणी प्रमाणपत्र त्याच्या छायाप्रती सह सादर केल्यावरच त्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. परीक्षेचे प्रवेशपत्र व

सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. पुढीलपैकी कोणतेही कागदपत्रे नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**अ) परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र**

**ब) मूळ फोटो ओळखपत्र**

**क) फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत**

**ड) परीक्षा शुल्क ऑनलाईन भरल्याची ई-पावती.**

## 12) केंद्राबाबतच्या सूचना

1. परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.
2. परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
3. बृहन्मुंबई महानगरपालिका कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि/ किंवा परीक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.
4. बृहन्मुंबई महानगरपालिका, उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.
5. उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत:च्या जबाबदारी व स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास बृहन्मुंबई महानगर पालिका त्यास जबाबदार राहणार नाही.
6. उमेदवाराने एकदा निवडलेल्या केंद्राची निवड अंतिम असेल.
7. पुरेशा संख्येने उमेदवार ऑनलाईन परीक्षेसाठी विशिष्ट केंद्राची निवड करत नसल्यास त्या उमेदवारांना इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा किंवा विशिष्ट केंद्रावर ऑनलाईन परीक्षेसाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा उमेदवारांची संख्या अधिक असल्यास, उमेदवाराला इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे
8. परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परिसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधणे वापरण्यास सक्त मनाई असेल.
9. प्रवेशपत्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ नमूद करण्यात येईल. परीक्षेचा कालावधी 100 मिनिटांचा असला तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, इत्यादी बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या 15 मिनिटे आधी परीक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
10. ऑनलाईन परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा काही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास एकापेक्षा जास्त सत्रामध्ये परीक्षा घेतल्या जातील.

## 13) दिव्यांग उमेदवारांकरिता सूचना.

◆ **लेखनिक वापरणा-या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सूचना -**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दिक.2 दि.05.10.2021 मधील निर्देशानुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात येतील. दिव्यांगाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवाराने निवड प्रक्रियेदरम्यान सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, दिव्यांग प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासन,

Mahabharti.in

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 नुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

13.1 लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि / अथवा उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास सदर ऑनलाईन परीक्षा देताना, स्वत:च्या लेखनिकाची मदत, खालील मुद्दा क्र. 13.2 व 13.3 च्या मर्यादांच्या अधिन राहून अनुज्ञेय आहे.

13.1-1 लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवाराने स्वखर्चाने स्वत:साठी लेखनिकाची व्यवस्था स्वत: करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

13.1-2 महाराष्ट्र शासन, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/ प्र.क्र.200/ दि.क.2 दि. 05.10.2021 मधील निर्देशांचे संबंधित उमेदवारांनी तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक 202110051504462322 असा आहे. सदर शासन निर्णयासोबत संलग्न करण्यात आलेल्या APPENDIX – I व APPENDIX – II च्या विहीत नमून्यातील प्रमाणपत्रांची पूर्तता संबंधित उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी पूर्ण करावयाची आहे.

13.1-3 लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार परीक्षेदरम्यान स्वत:चा लेखनिक वापरत असेल अशावेळी उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व विहीत पात्रता निकषांची पुर्तता केली आहे असे स्वत: उमेदवार आणि लेखनिक दोघांनीही हमी पत्र देणे बंधनकारक आहे. पुढे जर असे निदर्शनास आले की त्याने/तिने वरील कोणतेही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा दडविले आहेत, अशा उमेदवाराचा निकाल विचारात न घेता, त्याचा अर्ज रद्द केला जाईल. मदतनीस/लेखनिक कोणत्याही शैक्षणिक शाखेमधील असू शकतो. दिव्यांग उमेदवारास मदतनीस (लेखनीक/वाचक) वापरण्याची परवानगी असल्यास अशा परीस्थितीमध्ये मदनीस (लेखनीक/वाचक) यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

Mahabharti.in

13.1-4 लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि/ अथवा उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास मदतनीसाची मदत अनुज्ञेय आहे. मदतनीसाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराचे उत्तर लिहिण्यास मदत करणे अपेक्षित आहे. मदतनीसाने प्रश्न वाचून दाखविल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी चिन्हांकित (Marking) करणे अपेक्षित आहे.

13.1-5 ऑनलाईन परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, सदर उमेदवाराचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर परिक्षकाने परीक्षेनंतर लेखनिकाने ऑनलाईन प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला तर ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

13.2 **<u>चलनवलन विकलांगता व मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक तत्वे</u> :-**

लिहिण्यासाठी आवश्यक असणा-या अवयवांवर परिणाम झालेला असेल अशा चलनवलन दिव्यांगता व मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांनाच अतिरिक्त वीस (20) मिनिटे प्रतिपूर्ती वेळ दिला जाईल.

★परिपत्रक क्र. एमबीसी/396 दि.10.04.2024 मधील निर्देशानुसार Locomotor disablility या अस्थिव्यंग प्रकारामध्ये spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.

13.3 **<u>क्षीणदृष्टी असलेल्या उमेदवारांकरिता मार्गदर्शक तत्वे-</u>**

क्षीणदृष्टी असलेले उमेदवार (कमीतकमी 40% दिव्यांगत्व) ऑन लाईन परीक्षेची मोठया अक्षरांची स्क्रिन (magnifying font) वापरण्याचा पर्याय निवडू शकतात. अशा उमेदवारांना प्रती तास अतिरिक्त 20 मिनिटे प्रतिपूर्ती वेळ दिला जाईल. जे उमेदवार ऑनलाईन परीक्षेसाठी लेखनिकाची मदत घेतील त्याना परीक्षा देताना मोठ्या अक्षरांच्या स्क्रीनचा (Magnifying font) पर्याय उपलब्ध होणार नाही. वरील मार्गदर्शक **तत्वामध्ये** (GOI Guidelines/Clarifications) **मध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणांनुसार वेळोवळी बदल संभवतात.**

13.4 40% पेक्षा कमी हालचालीस बाधा आणणारी कमजोरी/गतिमंद (Locomotor disability/ Cerebral palsy) जे लिहू शकतात असे उमेदवार परीक्षेसाठी प्रत्येक तासाला 20 मिनिटे वेळ भरपाई मिळण्यास पात्र असतील. तथापि, त्यांना मदतनीसाचा वापर करता येणार नाही.

13.5 महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क्र.2 दि. 05.10.2021 अन्वये प्राप्त निर्देशानुसार व विशेष सूचनांनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी-सवलती लागू असतील. तसेच, दिव्यांग उमेदवार प्रती तासासाठी अतिरिक्त वीस मिनटे भरपाई वेळेस पात्र असतील.

**शासकीय सक्षम प्राधिका-यांकडुन किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 मधील निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.**

13.6 परिपत्रक क्र. एमबीसी/5448 दि. 30.07.2024 सोबतचा महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2024 / प्र.क्र.86/ दि.क 2 दि.27.06.2024 येथे नमूद केल्यानुसार केंद्रशासनाच्या धर्तीवर दिव्यांगत्वा संदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (UDID Card) बंधनकारक आहे.

## 14) इतर महत्वाच्या सुचना:

1. परीक्षा घेतांना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि / किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा विलंबाने परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. पुर्नपरीक्षेचे आयोजन याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.
2. या भरती प्रक्रीयेअंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणा करणा-यांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
3. ऑनलाईन परीक्षा, एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसात, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागल्यास -
   "If the examination is held in more than one session, the scores across various sessions will be equated to adjust for slight differences in difficulty level of different test batteries used across sessions. More than one session are required if the nodes capacity is less or some technical disruption takes place at any centre or for any candidate".
4. प्रत्येक उमेदवाराने दिलेल्या बरोबर व चुकीच्या उत्तरांचा पॅटर्न इतर उमेदवारांच्या उत्तरांशी जुळवून तपासला जाईल. जर, दोन किंवा अधिक उमेदवारांचा उत्तरांच्या पॅटर्न मध्ये शंकास्पद समानता आढळल्यास सदर उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असेल.
5. सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणा-या ऑनलाईन परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी / फेरतपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
6. **निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक/अनुचित प्रकार/गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही:-**

   उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

   **परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रीयेदरम्यान जर उमेदवार,**

Mahabharti.in

1. अनुचित प्रकार करणे किंवा
2. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा
3. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा
4. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा
5. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा
6. दळणवळणाची साधने, भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास**

1. तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.
3. जर उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

7. शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.

8. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

9. उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता/अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

10. सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करून उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत (print out) online प्राप्त करता येईल. सदर ऑनलाईन अर्ज उमेदवाराने स्वत:जवळ काळजीपूर्वक ठेवावा. पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परीक्षेअंती निवडलेल्या उमेदवारांनी अर्जामधील माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अटी (क्र. 16)(7) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह, नियुक्तीपूर्व अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

11. परीक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन-लाईन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

12. इतर कोणत्याही पद्धतीने उदाहरणार्थ पोस्टाने/कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

13. अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेसाठी प्रवेश पत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे आणि त्याची प्रत (print out) काढावी.

14. उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वत:चे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परीक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.

15. प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार, ऑन-लाईन परीक्षा बृहन्मुंबई/ठाणे/इतर जिल्ह्यात घेण्यात येईल. तथापि, आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.

16. उमेदवारांना परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

17. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

**15) <u>सर्वसाधारण अटी</u> -**

15.1 प्रस्तुत भरतीप्रक्रियेत अंतीम निर्णय घेण्याचे व प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे तसेच निवड प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याचे सर्व अधिकार **आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना** राहतील..

15.2 जाहिराती मध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो.

Mahabharti.in

15.3 विहित आरक्षणानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नेमणूका करण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता अटी/शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

15.4 अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र ऑन-लाइन अर्ज सादर करण्यापूर्वी अथवा प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे महानगरपालिका कर्मचारी संबंधित पदांकरिता निवड झाल्यास कर्मचा-यांविरुध्द कोणतेही न्यायालयीन, फौजदारी किंवा लाचलुचपत प्रकरण प्रलंबित नाही. तसेच,कर्मचा-यांविरुध्द कोणतेही प्राथमिक/खात्यांतर्गत किंवा अन्य कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित नाहीत. त्याचप्रमाणे कर्मचारी शिक्षाधीन नसल्याचे खातेप्रमुखांच्या स्वाक्षरीने चौकशीबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

15.5 उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन-कोड सह) वैध, सुस्पष्ट व पूर्ण असावा.

15.6 इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

15.7 उमेदवाराने निवडप्रक्रीये दरम्यान दस्तऐवज पडताळणी वेळी खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या स्वसाक्षांकित/अधिकृत पदाधिका-यांनी साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे.

ए. शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

बी . माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत

सी. पदविका/पदवी, पदव्युत्तर पदवी (असल्यास) परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षांच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत. तथापि, पदविका/पदवी परीक्षेची मुळ गुणपत्रिका पुढील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अथवा महाविद्यालय यांच्याकडे सुपुर्द केली असल्यास त्याबाबतचे संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्यांनीच साक्षांकित केलेली पदविका/पदवी परीक्षेची छायांकित गुणपत्रिका आणणे आवश्यक आहे,

डी. एस. एस.सी., पदविका/पदवी किंवा तत्सम परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण झालेले असल्यास उमेदवारांनी प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे सर्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ई. शासन निर्णय क्र. संकीर्ण – 2021/प्र.क्र. 297/ मावक दि. 26.04.2022 नुसार वैध नॉन-क्रिमिलेअर पडताळणी प्रमाणपत्राशिवाय केवळ जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या आधारे कोणतेही लाभ अनुज्ञेय होत नाहीत. यास्तव, अजा, अज वगळता सर्व मागासप्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तसेच, शासन निर्णय क्र. संकीर्ण 2017/प्र.क्र. 191/17/ कार्या - 2 दि. 15.12.2017 व क्र. सीबीसी-2020/प्र.क्र.18/मावक दि. 31.01.2020 अन्वये नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेला परिशिष्ट - 2 अर्ज व सोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची तहसिल कार्यालयामार्फत साक्षांकित केलेली छायांकीत प्रत सादर करावी. शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-2023/प्रक्र. 76/ मावक दि. 17.02.2023 अन्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची वैधता ऑनलाईन अर्ज रजिस्टर केल्याच्या वित्तीय वर्षाच्या कालावधीतील असावी.

एफ. मागासवर्गीय प्रवर्गाकरीता आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे. नियुक्तीच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16 बी दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल. मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवाराने संबधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना

सादर करणे आवश्यक आहे. मागासवर्गीय कर्मचा-याने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन संबंधित जात पडताळणी समितीकडून त्याची पोचपावती सादर न केल्यास, तसेच त्यांनी सादर केलेले ''जात प्रमाणपत्र'' संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांच्या विरूध्द कोणतीही खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करता नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

जी. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) संवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. राआधो 4019/ प्र.क्र. 31/16-अ दि. 12.02.2019 व दिनांक 31.05.2021 अन्वये सक्षम प्राधिकारांकडून प्राप्त केलेले वैध आदुघ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज रजिस्टर केल्याच्या कालावधीपासून निवड प्रक्रीया चालू असतानाच्या कालावधीपर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

एच. महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इ. तपशील आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळवून त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणी वेळी सादर करावे.

आय. विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे, (विवाहित महिला लग्नापूर्वीच्या नावाने सुध्दा अर्ज करु शकतात.)

जे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/43 दि.01.06.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि.04.05.2023 मधील निर्देशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

के. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतूदी लागू राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियूक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

एल. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत, महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2021/प्र.क्र.297/मावक दि.26.04.2022 मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवाराच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी, संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

एम. शासन अधिसूचना दि. 28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही 2000/प्र.क. (17/2000) बारा दि. 01.07.2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. तसे विहित नमुन्यात रु.100 चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने / तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

एन. खेळाडूंनी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.01.07.2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.18.08.2016 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

'ब' संवर्गातील खेळाडू आरक्षांतर्गत पदांकरीता पात्र होण्याकरीता पात्र स्पर्धांचा / खेळांचा उल्लेख शासन निर्णय क्र. राक्रीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.01.07.2016 मधील परीशिष्ट - अ मध्ये करण्यात

आलेला आहे.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच ते ज्या क्रिडा विभागात वास्तव्यास आहेत त्या विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची दिनांक उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद करणे आवश्यक आहे, अन्यथा सदर ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही.

वरीलप्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत असल्याशिवाय खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

ओ. फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.

पी. उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहित प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल.

15.8 उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे बंधनकारक आहे.

15.9 पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी संबधित पोलिस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नियुक्ती केली जाईल.

15.10 उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास सेवेत प्रत्यक्ष नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीतील उमेदवाराची चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करण्यात येईल. सदर कालावधीत उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास, सदर उमेदवाराचे नियुक्तीपत्र रद्दबादल करुन भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल.

15.11 परिपत्रक क्र.एमपीएम/II/3213 दि.22.02.2008 च्या सोबतचा शासन निर्णय क्र. संकिर्ण/2007/पडताळणी/नवि-26 दि.21.11.2007 अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. तसेच शासन परिपत्रक क्र.याचिका-3013/प्र.क्र.120 नवि मंत्रालय दि.19.11.2014 मध्ये दिलेल्या निदेशानुसार निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशनकडुन चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

15.12 सदर परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची निवडीच्या निकाषांप्रमाणे, सामाईक गुणवत्ता यादी प्रसारित केल्यानंतर, गुणवत्तेनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन तात्पुरती निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in/forprospects/Careers-All/Recruitment/CityEngineer या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर तात्पुरती निवडयादी उमेदवारांच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषांगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. कागदपत्रे पडताळणी अंती अंतिम निवडयादी प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवाराने आवश्यक प्रामणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल.

15.13 उमेदवाराची मूळ कागदपत्रे पडताळणी करुन ती नियमानुसार यथायोग्य असल्यास नेमणूक करण्यात येईल. तथापि, नेमणूकीच्या कार्यवाही दरम्यान उमेदवार निवडीच्या विहीत अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर लक्षात आल्यास त्याची नेमणूक रद्द करण्यात येईल.

15.14 अराखीव (खुला) पदांकरीता उच्च गुणवत्ताधारक सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

15.15 निवडयादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून 1 वर्षासाठी किंवा निवडयादी तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, त्यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर

Mahabharti.in

ही निवडयादी व्यपगत होईल. निवडयादीच्या विधीग्राह्यतेच्या कालावधी मध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. तसेच शैक्षणिक , व्यावसायिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणी सापेक्ष तात्पुरती निवडयादी तयार करुन, पडताळणीअंती अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

15.16 सदर भरती प्रक्रियेमध्ये तयार करण्यात आलेली निवडयादी कोणत्याही वेळेस पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा निवड यादीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आहेत. यास्तव, उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट असले तरीही सदर पदावर त्याचा नियुक्तीकरीता कोणताही अधिकार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

15.17 उमेदवारांची नियुक्ती ही गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, रिक्त पदांची उपलब्धता/आवश्यकता, निवडयादीची विधीग्राह्यता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येईल.

15.18 कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता ( यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता ( यांत्रिकी व विद्युत) संवर्गातील रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार निवडयादी तयार करुन आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रिया तसेच निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

15.19 विहित आरक्षणानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नेमणूका करण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

15.20 जर एखाद्या उमेदवाराने नियुक्तीवेळी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता ( यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता ( यांत्रिकी व विद्युत) पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव सदर पदावर काम करण्यास नकार दिल्यास, त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.

15.21 निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 व बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, 2015 लागू होतील.

15.22 निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

15.23 निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

15.24 प्रस्तुत भरती प्रक्रियेअंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमित्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व तीन वर्षानंतरचे सेवा-सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

15.25 महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि.06.04.2023 सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि. 10.05.2023 मधील निर्देशानुसार अनाथांची पदे भरण्यात येतील. प्रस्तृत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनाथांसाठी प्रामणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दतीचा अवलंब करुन, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तरी ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

15.26 बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणा-या उमेदवारांना 1% अनाथ आरक्षण लागू राहिल. निवड झाल्यानंतर प्रमाणपत्र पडताळणीवेळी अनाथ

Mahabharti.in

आरक्षणांतर्गत मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनाथांसाठी आरक्षित पदावर निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

तसेच, अनाथ आरक्षणाकरीता सादर केलेल्या प्रमाणपत्राची फेरतपासणी विभागीय आयुक्त, महिला व बाल विकास यांच्यामार्फत नियुक्तीपूर्वी करुन घेण्यात येईल.

15.27 निवडीस पात्र होणा-या नि:समर्थ उमेदवारांचे शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40 टक्के नि:समर्थ असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच नि:समर्थ असल्याबाबात महापालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करून घेण्यासाठी अनुक्रमे परिपत्रक क्र. एमबीसी/3051 दि. 22.01.2013 आणि परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर दिव्यांग कर्मचा-यांकडे शासन निर्णय क्र. अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि. 14.09.2018 नुसार दिव्यांगत्वाचे नवीनतम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

15.28 निवड झालेल्या उमेदवारांना, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय परिक्षकांकडे वैद्यकीय परिक्षणाकरिता पाठविण्यात येईल. तसेच, दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदावर अर्ज करणा-या उमेदवाराने किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांना शारिरीकदृष्ट्या पात्र ठरविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्या नंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

15.29 शासन निर्णय क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि. 05.10.2021 अन्वये प्राप्त निर्देशाप्रमाणे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यात येतील. दिव्यांगाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवाराने निवड प्रक्रियेदरम्यान सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, दिव्यांग प्रमाणपत्राबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दि. 14.09.2018 च्या शासन निर्णयानुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

15.30 सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता ( यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता ( यांत्रिकी व विद्युत) या पदांकरिता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

15.31 बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागसवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/6257 दि. 20.01.2020 अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही सुरु असलेल्या कर्मचा-यांचे तसेच, मुळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी अद्याप अ.ज. प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास आणि अ.ज. प्रवर्गातून नियुक्तीनंतर विशेष मागास प्रवर्गाचे विकल्प स्विकारलेल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

15.32 निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम 'सुरक्षा अनामत रक्कम' म्हणून महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणा करणे आवश्यक राहील किंवा तशा आशयाचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल. सदर भरलेली 'सुरक्षा अनामत रक्कम' परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. तथापि, उमेदवाराने महानगरपालिकेतील नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास/राजीनामा दिल्यास तसेच कोणत्याही अन्य कारणास्तव सेवा समाप्त झाल्यास, त्यांना सदर 'सुरक्षा अनामत रक्कम' परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

15.33 निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळ्यांमध्येही (Shift duties) काम करावे लागेल याची नोंद घ्यावी.

15.34 वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

15.35 काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमधे बदल करावा लागल्यास, त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in/forprospects/Careers-All/Recruitment/CityEngineer या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

Mahabharti.in

15.36 सदर भरतीप्रक्रिये संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in/forprospects/Careers-All/Recruitment/City Engineer या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे. सदर भरतीप्रक्रिये संदर्भात लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

15.37 उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

15.38 उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. सामाजिक व समांतर आरक्षणाअंतर्गत अर्ज करणा-या उमेदवारास महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

15.39 निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

15.40 उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणारे वि.जा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, विमाप्र, इमाव प्रवर्गातीमधील उमेदवार, मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.

15.41 **ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या पडताळणीशिवाय ऑनलाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे, उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.**

**17) विशेष सूचना -**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी, अन्य प्रकारे सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2. सेवायोजन कार्यालय प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

3. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

4. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

5. मध्यस्थ/ठग/ बृहन्मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहाण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

6. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता ( यांत्रिकी व विद्युत), दुय्यम अभियंता (स्थापत्य) व दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांकरिता घेण्यात येणारी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रातील मुंबई शहरासह इतर राज्यातील मध्यवर्ती शहरांमध्ये घेण्यात येईल.

7. परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या उद्भवल्यास त्याचा परिणाम ऑनलाईन परीक्षेवर किंवा निकालावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये परीक्षेस होणारा विलंब, उमेदवारांवर होणारा परिणाम, तसेच उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्यास लागू नये यासह सर्व बाबींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न परीक्षा आयोजित करणा-या संस्थेद्वारा करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये जे उमेदवार सहाकार्य करण्यास इच्छुक नसतील अशा

Mahabharti.in

उमेदवारांना भरती प्रक्रियेमधून पुर्णतः वगळण्यात येईल.

उमेदवारांनी उपरोक्त जाहिरातीचे संपूर्ण अवलोकन करुन, विहित मुद्दतीत अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

**सही/-**
**दि.25.11.2024**
**नगर अभियंता**

Mahabharti.in